# पाठ्यक्रम

## विषय – कलाशिक्षण

कलागट : चित्र–शिल्प

इयत्ता १ ली

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| चित्र | **रेखांकन** | • **ठिपके –** गोल ठिपके, लंबगोल ठिपके, त्रिकोणी ठिपके, चौकोनी ठिपके<br>• **रेषा –** तुटक रेषा, आडवी रेषा, उभी रेषा, तिरपी रेषा.<br>• **आकार –** गोल, त्रिकोणी, चौकोनी आकार | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, परिसरात सहज उपलब्ध होईल असे अन्य योग्य साहित्य. | • गोल, लंबगोल, त्रिकोणी, चौकोनी इत्यादी विविध प्रकारच्या ठिपक्यांची ओळख करून घेतात व काढतात.<br>• तुटक/आडवी/उभी/तिरपी इत्यादी रेषांची ओळख करून घेतात. यांत्रिक साधनांशिवाय रेषा रेखाटनाचा सराव करतात व रेषा गिरवतात.<br>• यांत्रिक साधनांशिवाय गोल, त्रिकोणी, चौकोनी आकाराचे रेखाटन करतात.<br>• निसर्गातील विविध आकारांचे निरीक्षण करतात.<br>• रेषा, आकार अचूकपणे ओळखतात.<br>• विविध उपलब्ध माध्यमे हाताळून रेखाटनाचा अनुभव घेतात. |
| | **स्मरणचित्र – कल्पनाचित्र** | • स्वतःशी संबंधित सोप्या वस्तूंची मुक्त रेखाटने उदा. चेंडू, बॅट इ. | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, परिसरात सहज उपलब्ध होईल असे अन्य योग्य साहित्य. | • परिचित वस्तूंचे आकार व रंग यांचे निरीक्षण करतात.<br>• सोप्या आकारांतील वस्तूंचे स्मरणाने मुक्तपणे रेखाटन करण्याचा सराव करतात.<br>• विविध उपलब्ध माध्यमांद्वारे रेखाटनाचा सराव करून अनुभव घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | | | | • स्वत:च्या कल्पना मुक्तपणे मांडतात.<br>• रेखाटनात रंगाचा कल्पकतेने वापर करतात.<br>• इतरांशी, रेखाटलेल्या चित्राबद्दल बोलतात. |
| | **नक्षीकाम (सजावट)** | • ठिपके, रेषा व आकारांचे नक्षीकाम<br>• मुद्रा/कोलाज तंत्राचा नक्षीकामासाठी वापर | पाटी-पेन्सिल, रंगीत खडू, पेन्सिल, कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कोळसा, गेरू, वॅक्स क्रेयॉन्स, शाई, रंग, खळ, डिंक, विविध रंग व पोताचे कागद, भेंडी, दोरा, कांदा, बटाटा, बोटांचे ठसे, तसेच ठसे घेता येतील अशा वस्तू, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • ठिपके, रेषा व गोल/त्रिकोण/चौकोन यांसारख्या आकारांचा आवडीप्रमाणे नक्षीकामात उपयोग करतात.<br>• सजावटीसाठी आवडीचे रंग वापरतात.<br>• सजावटीसाठी मुद्रा/कोलाज तंत्राचा वापर करतात.<br>• मुद्रा उठविण्यासाठी परिसरातील वस्तूंचा संग्रह करतात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • मातीचे गोल, लंबगोल मणी,वळ्या, लादी (स्लॅब) | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले-क्ले) इत्यादी. | • मातकामासाठी योग्य प्रकारे माती तयार करतात.<br>• तळहात व बोटांनी माती हाताळण्याचा सराव करतात.<br>• गोल, लंबगोल, लहानमोठे मणी तयार करतात व आकारातील फरक अनुभवतात.<br>• मातीच्या लांब वळ्या, लादी तयार करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागदांची ओळख<br>• कागद फाडणे/घड्या घालणे/चिकटवणे, कागदाच्या सोप्या वस्तू तयार करणे. | वृत्तपत्रे, मासिके, पतंगी कागद, घोटीव कागद, सोनेरी–रुपेरी कागद, जाड–पातळ कागद, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर, डिंक, खळ इ. | • विविध प्रकारच्या कागदांची ओळख करून घेतात.<br>• विविध आकारात कागद हाताने फाडतात, कागदाला घड्या घालतात, कागद चिकटवितात.<br>• कागद फाडणे, घडी घालणे व चिकटविणे यांचा अनुभव घेतात.<br>• कागदाच्या सोप्या वस्तू तयार करतात (उदा. टोपी, पक्षी, विमान)<br>• विविध प्रकारच्या रंगीत कागदांचा संग्रह करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • सपाट पृष्ठभागावर सजावट | निरुपयोगी वस्तू, विविध प्रकारचे कागद, बिया, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक तसेच परिसरात सहज उपलब्ध होतील असे इतर साहित्य. | • परिसरातील निरुपयोगी/निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• सजावटीसाठी योग्य वस्तूंची निवड करतात.<br>• वस्तूंच्या पृष्ठभागावर अन्य निरुपयोगी वस्तू चिकटवून सजावट करतात.<br>• वस्तू सजावटीमधून नवनिर्मितीचा आनंद घेतात. |

## विषय - कला शिक्षण

**कलागट : संगीत (गायन-वादन)** **इयत्ता १ ली**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| गायन | **बडबड गीते** | अक्षर व आकड्यांची गीते | तालवाद्य, हार्मोनियम, सी.डी., टेपरेकॉर्डर, मोबाईल, संगणक, पेनड्राईव्ह | • तक्त्यांचे व शिक्षकांच्या कृतीचे निरीक्षण करून अनुकरण करतात.<br>• अक्षर उच्चारण, संख्या उच्चारण योग्य रीतीने करू लागतात.<br>• अक्षर संकल्पना, संख्या संकल्पना समजतात.<br>• आद्याक्षरप्रधान गीते म्हणू लागतात.<br>• या गीतांतून अन्य अभ्यासविषयांना पूरक गीतांचा सराव करतात.<br>• गीतातील नाद व लय अनुभवतात. |
| | **समूहगीत** | राष्ट्रगीत :जनगणमन(गायन) वंदेमातरम् (श्रवण) | हार्मोनियम, टेपरेकॉर्डर | • राष्ट्रगीत, वंदे मातरम् वारंवार ऐकून त्यांतील शब्द व उच्चारण जाणून घेतात.<br>• राष्ट्रगीत स्पष्ट उच्चारांत पाठांतरासह म्हणतात.<br>• सामूहिक गायनातील शिस्तीचे महत्त्व समजून घेतात.<br>• समूहभावना मनात बाळगतात. |
| | **लोकगीत** | पारंपरिक स्थानिक लोकगीते व त्या धर्तीवर रचलेली लोकगीते ऐकवणे. | पूर्व ध्वनिमुद्रण सी.डी.प्लेअर टेपरेकॉर्डर, मोबाईल, संगणक, पेनड्राईव्ह, गीतातील व्यक्तिरेखांची चित्रे, ध्वनिफीत, चित्रफीत इ. | • लोकगीतांची सोपी सुरावट समजून म्हणतात.<br>• स्थानिक लोकगीतांची ओळख, परिचय करून घेतात.<br>• गीतातून विशिष्ट व्यक्तिरेखेचा परिचय करून घेतात.<br>• सांस्कृतिक परंपरांचा आनंद घेतात. |
| वादन | **वादन परिचय** | **हातांच्या टाळ्या**<br>१ ते ४ आकड्यानुसार | दैनंदिन वापरातील उपलब्ध साधने. (उदा. पट्टी, उपलब्ध तालवाद्ये, अन्य माध्यमे) | • १ ते ४ आकड्यांच्या विविध रचनांनुसार टाळ्या वाजवतात.<br>• लयीत व एकत्रितपणे कार्य करण्यास उद्युक्त होतात.<br>• लय/तालाची गंमत अनुभवतात.<br>• सांघिक कृती करू लागतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **पार्श्वसंगीत** | विविध नैसर्गिक गोष्टींच्या आवाजांचा परिचय. (उदा.प्राणी,पक्षी,ढगांचा गडगडाट,वारा यांसारख्या गोष्टींच्या आवाजांची तोंडाने निर्मिती.) | विविध आवाजांचे ध्वनिमुद्रण कॅसेट, सी.डी.प्लेअर, पेनड्राईव्ह, संगणक, मोबाईल, मौखिक ध्वनी. | • विविध आवाजांचा परिचय करून घेतात.<br>• प्राणी, पक्षी, वारा, ढगांचा गडगडाट इ. आवाजाचे अनुकरण करतात.<br>• नैसर्गिक गोष्टींचे निरीक्षण व आवाजाचे श्रवण करतात.<br>• वातावरण निर्मितीसाठी आवश्यक ध्वनीची निर्मिती करतात. |

## विषय – कला शिक्षण

**कलागट : संगीत (नृत्य)** **इयत्ता १ ली**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | **हालचाली** | • शीर (डोके), मान व हातांच्या हालचाली. | शब्दसंदेश,<br>डोलणारी बाहुली व अशा प्रकारच्या हालचाली करणारी खेळणी | • विविध हालचालींचे निरीक्षण करतात.<br>• शब्दसंदेशाचे महत्त्व जाणून घेतात व पालन करतात.<br>• विविध हालचालींमधून लवचिकता, चपळता साधतात.<br>• शरीराचा तोल सांभाळतात.<br>• हालचालींमधून विविध दिशा जाणून घेतात.<br>• डौलदार हालचाली सादर करतात. |
| | **उड्या मारणे** | • एका व दोन पायांच्या उड्या | शब्दसंदेश, दोरी, बांबू | • शिक्षकांच्या कृतींचे निरीक्षण करतात.<br>• लांब उडी, उंच उडी यांतील फरक जाणतात.<br>• शरीराचा तोल सांभाळतात.<br>• विविध प्रकारच्या उड्यांमधून लवचिकता साधतात.<br>• दोरी, बांबू यांसारख्या साहित्याचा उपयोग उड्या मारण्यासाठी करतात. |
| | **अभिनय गीत** | **साभिनय बडबड गीते**<br>• प्राणी, पक्षी | हार्मोनियम, तालवाद्ये, सी.डी., कॅसेट, पूर्वध्वनि–मुद्रित गीते | • गीतांचे लक्षपूर्वक श्रवण करतात.<br>• प्राणी–पक्ष्यांच्या विविध हालचालींचे निरीक्षण करतात.<br>• प्राणी–पक्ष्यांच्या हालचालींचे अनुकरण करतात.<br>• गीतानुरूप अभिनय करतात, अभिनयासह गीत सादर करतात.<br>• सांघिक कामाचे महत्त्व समजून घेतात. |

# विषय – कला शिक्षण

**कलागट : नाट्य** **इयत्ता १ ली**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • शरीराची मुक्त हालचाल हात, पाय, धड, डोके, मान यांची मुक्त हालचाल.<br>• प्राणी–पक्षी कृतींचे निरीक्षण | कृती करण्यास योग्य शब्दसंदेश, सूचना | • शरीराचे विविध अवयव जाणून घेतात.<br>• सूचनेनुसार हात, पाय, धड, डोके, मान इ. च्या मुक्त हालचाली करतात.<br>• आत्मविश्वासाने शरीराच्या मुक्त हालचाली करतात.<br>• प्राणी व पक्षी यांच्या हालचालींचे निरीक्षण व अनुकरण करतात.<br>• विविध हालचालींतून आनंद मिळवितात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभवकथन** | • स्वतःची ओळख<br>• स्वर, व्यंजने, शब्द यांचे उच्चार करणे.<br>• कुटुंबातील छोट्या प्रसंगांचे कथन | सूचना, तक्ता, मुळाक्षरे, फलक लेखन, पाठ्यपुस्तकातील शब्द, छोटे प्रसंग/घटना इ. चे संवाद. | • स्वतःचे नाव सांगतात.<br>• श्रवण, निरीक्षणाद्वारे स्वर, व्यंजने यांचा उच्चार करतात.<br>• पाठ्यपुस्तकातील शब्दांचे उच्चार करतात.<br>• अर्थानुसार शब्दांचे उच्चार करतात.<br>• कुटुंबातील व्यक्तींची माहिती सांगतात.<br>• लहान लहान प्रसंगांचे अनुभव आठवून वर्णन करतात.<br>• विविध लहान प्रसंगांतील संवाद समजून घेतात. |
| | **सादरीकरण/ एकात्मिक सादरीकरण** | • कुटुंबातील लहान प्रसंगांचे साभिनय सादरीकरण.<br>• पाठ्यपुस्तकातील गीत / कवितांचे साभिनय सादरीकरण | छोटे–छोटे प्रसंग, घटना इत्यादींचे संवाद, पाठ्यपुस्तकातील गीते, कविता. | • कुटुंबातील व्यक्तींची नक्कल करतात.<br>• लहान लहान कौटुंबिक प्रसंगांचे अभिनयासह सादरीकरण करतात.<br>• पाठ्यपुस्तकातील गीते, कविता यांचे साभिनय सादरीकरण करतात.<br>• सादरीकरणातून आनंद मिळवितात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • पडदा – विद्यार्थ्यांनीच पडदा म्हणून उभे राहणे व दोन बाजूंना सरकणे. | वर्ग, विद्यार्थी, वर्गातील उपलब्ध साहित्य, कृतिपुस्तिका | • सांघिक भावनांचा अनुभव घेतात.<br>• धीटपणाने वावरतात.<br>• शिस्तीचे महत्त्व जाणून घेतात.<br>• पडदा कसा उघडतो व बंद होतो यांची कृती समजून घेतात. |

## विषय – कला शिक्षण

कलागट : चित्र–शिल्प | इयत्ता २ री

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| चित्र | रेखांकन | • **ठिपके –** गोल ठिपके, लंबगोल ठिपके, त्रिकोणी ठिपके, चौकोनी ठिपके<br>• **रेषा –** सरळ रेषा, वक्र रेषा, आडवी रेषा, उभी रेषा, तिरपी रेषा.<br>• **आकार –** गोल, त्रिकोण, चौकोनी आकार व त्यावर आधारित वस्तू, फळांचे आकार. | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • रेषा, ठिपके व आकार अचूकपणे ओळखतात.<br>• गोल, लंबगोल, त्रिकोणी, चौकोनी ठिपके इत्यादी विविध प्रकारचे ठिपके रेखाटण्याचा सराव करतात.<br>• सरळ/वक्र/आडवी/उभी आणि तिरपी रेषा रेखाटण्याचा सराव करतात व रेषा गिरवतात.<br>• विविध माध्यमे हाताळून रेखाटनाचा अनुभव घेतात.<br>• कोणत्याही यांत्रिक साधनांशिवाय गोल, त्रिकोणी, चौकोनी आकार रेखाटन करतात. फळांच्या आणि वस्तूंच्या आकार रेखाटनाचा सराव करतात.<br>• निसर्गातील विविध आकारांचे निरीक्षण करतात.<br>• सूचित आकारावर आधारित फळांचे, वस्तूंचे रेखाटन करतात. (उदा. सीताफळ, गाजर, घर, चेंडू, बशी, वाटी इ.) |
| | **स्मरणचित्र – कल्पनाचित्र** | • स्वतःशी संबंधित, परिचित सोप्या वस्तू आणि परिसरातील गोष्टींची मुक्त रेखाटने. | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • निसर्गातील निरनिराळे घटक जसे – झाडे, घर, प्राणी, पक्षी, ढग, मानव इत्यादींच्या आकारांचे व रंगाचे निरीक्षण करतात.<br>• परिसरातील दैनंदिन प्रसंग/घटना/दृश्य इत्यादींचे निरीक्षण करतात.<br>• छोट्या, सोप्या गोष्टींचे रेखाटन, 'स्मरणाने' मुक्तपणे करतात. (उदा. झाडावरील पक्षी, मी, माझे घर)<br>• आवडीचे रंग वापरून चित्र रंगवितात व आनंद घेतात.<br>• पाठ्यपुस्तकातील व इतर पुस्तकांतील काल्पनिक–कथा, गोष्टी, कवितांमधील चित्रांचे निरीक्षण करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | | | | • स्वत:च्या कल्पना मुक्तपणे मांडतात.<br>• रेखाटनात कल्पकतेने रंगांचा वापर करतात.<br>• चित्रातील रेखाटन व रंगकामाच्या नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• रेखाटलेल्या चित्राविषयी बोलू लागतात. |
| | **नक्षीकाम (सजावट)** | • आवडीच्या बाह्य आकारात नक्षीकाम (सजावट)<br>• मुद्रा/कोलाज यांसारख्या तंत्राचा सजावटीसाठी वापर | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, शाई, रंग, विविध रंग व पोताचे कागद, खळ–डिंक, भेंडी, कांदा, बटाटा, तसेच ठसे घेता येतील अशा वस्तू, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • ठिपके, रेषा व गोल/त्रिकोण/चौकोन यांसारख्या आकारांची आवडीप्रमाणे मांडणी करतात.<br>• आवडीच्या बाह्य आकारात सजावट करतात.<br>• सजावटीसाठी आवडीच्या रंगांचा वापर करतात.<br>• ठसेकामासाठी परिसरातील वस्तूंचा संग्रह करतात.<br>• अधिक सौंदर्यनिर्मितीसाठी मुद्रातंत्र/कोलाज तंत्राचा वापर करतात.<br>• नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • मातीचे गोल, लंबगोल, चौकोनी घनाकार<br>• वळ्या, लादी (स्लॅब)<br>• गोलाकारावर आधारित सोप्या आकारांच्या फळांचे घनाकार | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले–क्ले) | • मातकामासाठी योग्य प्रकारे माती तयार करतात.<br>• माती हाताळण्याचे कौशल्य जाणून घेतात.<br>• विविध फळांचे निरीक्षण करतात.<br>• गोल, लंबगोल, चौकोनी घनाकार तयार करतात व आकारांतील फरक अनुभवात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागदांची ओळख<br>• कागद फाडणे/घड्या घालणे/चिकटवणे, कागदाच्या सोप्या वस्तू. | घोटीव कागद, सोनेरी–रुपेरी कागद, पतंगी कागद, जुनी मासिके, वृत्तपत्रे, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर, अन्य जाड–पातळ कागद, डिंक, खळ आणि सहज उपलब्ध होतील असे इतर साहित्य. | • विविध प्रकारच्या रंगीत कागदांचा संग्रह करतात.<br>• विविध प्रकारच्या कागदांची ओळख सांगतात.<br>• विविध आकारांत कागद हाताने फाडतात, कागदाला घड्या घालतात, कागद चिकटवितात.<br>• कागद फाडणे, घडी घालणे व चिकटविण्याचा अनुभव घेतात.<br>• कागदाच्या सोप्या वस्तू तयार करतात/वस्तूंची सजावट करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • त्रिमित वस्तूंची सजावट | निरुपयोगी वस्तू, रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे (बोळके), बिया, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • परिसरातील निरुपयोगी/निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• सजावटीसाठी योग्य वस्तूंची निवड करतात.<br>• त्रिमित वस्तूच्या पृष्ठभागावर अन्य निरुपयोगी वस्तू चिकटवून स्वत:च्या कल्पनेतून सजावट करतात.<br>• वस्तू सजावटीमधून नवनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात. |

## विषय - कला शिक्षण

**कलागट : संगीत (गायन-वादन)** **इयत्ता २ री**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **गायन** | **बडबड गीते** | प्राणी, पक्षी गीते. | सी.डी. प्लेअर, चित्रे, कॅलेंडर, टेपरेकॉर्डर व अन्य उपलब्ध माध्यम, हार्मोनियम, तालवाद्ये, तक्ते. | • गीतात उल्लेख असलेल्या प्राणी-पक्ष्यांच्या आवाजांचे श्रवण व हालचालींचे निरीक्षण करतात.<br>• गीतात वर्णन असलेल्या प्राणी-पक्ष्यांचा अभिनय करतात व गीताचा आनंद घेतात.<br>• शिक्षकांच्या कृतीचे निरीक्षण करून अनुकरण करतात.<br>• गीतातील विशिष्ट नाद व लयींच्या अनुभवातून आनंद घेतात. |
| | **समूहगीत** | राष्ट्रगीत, प्रार्थना | हार्मोनियम, टेपरेकॉर्डर, तालवाद्ये. | • राष्ट्रगीत तालासुरात आणि समजून म्हणतात.<br>• राष्ट्रभक्तीची भावना वाढीस लागते.<br>• प्रार्थनेतून शांतता अनुभवतात.<br>• सांघिक भावनेचे महत्त्व जाणून घेतात.<br>• गायनाची शिस्त अनुभवतात. |
| | **लोकगीत** | कोळीगीत, धनगरगीत, शेतकरीगीत यांसारखी 'निसर्गविषयक' गीते | हार्मोनियम, तालवाद्ये, उपलब्ध वस्तू, चित्रे | • लोकगीतातील वेशभूषा लक्षात घेतात.<br>• सहज सोप्या सुरावटी जाणून घेऊन आत्मसात करतात.<br>• व्यक्तिरेखेची वैशिष्ट्ये समजून घेतात.<br>• लोकगीतातील उत्स्फूर्ततेचा आनंद घेतात. |
| **वादन** | **वादन परिचय** | **हातांच्या टाळ्या**<br>१ ते ८ किंवा १६ आकड्यांपर्यंत | शब्दसूचना व कृती, उपलब्ध तालवाद्ये | • १ ते ८ आकड्यांच्या विविध रचनानुसार टाळ्या वाजवतात.<br>• निर्माण होणारी लय जाणतात.<br>• आकड्यांच्या नवनवीन रचना करून नवनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• सामूहिक सादरीकरणाचे महत्त्व जाणतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **पार्श्वसंगीत** | मानवनिर्मित गोष्टींपैकी विविध वाहनांची (उदा. घोडागाडी, विमान इ.) उपलब्ध साधनांद्वारे आवाज निर्मिती.<br>उदा. आगगाडी स्टेशनात येणे. | परिसरातील उपलब्ध योग्य साधने व माध्यम. उदा. पट्टी, टाळ्या, तोंडाने आवाज करणे, ताल-वाद्यांचा उपयोग, झाडांची पाने, वाळलेल्या शेंगा, रिकामे डबे | • पार्श्वसंगीताचा अर्थ समजून घेतात.<br>• घोडागाडी, बैलगाडी, विमान यांसारख्या वाहनांचे आवाज बारकाईने श्रवण करतात.<br>• आवाजाचे चढ-उतार करू लागतात.<br>• गटनिहाय कृतीला इतर मुले आवाजाची जोड देऊन वातावरण निर्मिती करतात.<br>• सामूहिक कृतीचा आनंद घेतात. |

## विषय – कला शिक्षण

**कलागट : संगीत (नृत्य)** **इयत्ता २ री**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | **हालचाली** | • हात व पायांच्या लयबद्ध हालचाली<br>• **अदबशीरपणा** चालण्याच्या पद्धती, नमस्काराच्या पद्धती. | हातांच्या टाळ्या, तालवाद्ये, शब्दसूचना, कृती. | • हालचालींचे निरीक्षण करतात.<br>• कृतीतून लय समजून घेतात.<br>• लयबद्ध हालचाली जाणून घेतात.<br>• १–२, १–२ च्या लयीत टाळ्या वाजवितात.<br>• अदबशीरपणा समजून घेतात.<br>• रूबाबात व दमदार पावले टाकून चालणे जाणून घेतात.<br>• वाकून नमस्कार करणे, अदबशीरपणे नमस्कार करणे यांसारख्या पद्धती जाणून घेतात.<br>• शब्दसूचनांचे पालन करून अनुकरण करतात.<br>• स्वकल्पकतेने लयबद्ध हालचाली करतात. |
| | **उड्या मारणे** | • प्राण्यांच्या उड्या,<br>• पक्ष्यांच्या उड्या | शब्द संदेश, कृती | • परिसरातील प्राणी, पक्ष्यांचे निरीक्षण करतात.<br>• त्यांच्या सवयी जाणून घेतात.<br>• अनुकरणातून योग्य कृती करतात.<br>• शरीराचा तोल सांभाळतात.<br>• चपळता, लवचिकता साधतात.<br>• प्राणी, पक्षी यांच्या उड्यांमधील फरक जाणून घेतात. |
| | **अभिनय गीत** | • बडबड गीतांवर कृती.<br>• नातेसंबंधी गीतांवर कृती | पूर्वध्वनिमुद्रित सी.डी., कॅसेट, चित्रे, मोबाईल, उपलब्ध वाद्ये | • घरातील, कुटुंबातील व्यक्तींचे निरीक्षण करतात.<br>• कुटुंबातील विविध नाती समजून घेतात.<br>• आपलेपणाची भावना व्यक्त करतात.<br>• कृतियुक्त अभिनय करतात. |

## विषय - कला शिक्षण

**कलागट : नाट्य** | **इयत्ता २ री**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • शरीराची लयबद्ध हालचाल, हातपाय, धड, डोके यांच्या लयबद्ध हालचाली. | कृती करण्यास योग्य शब्दसंदेश, सूचना | • सूचनेनुसार हात, पाय, धड, डोके यांच्या लयबद्ध हालचाली करतात.<br>• विविध हालचालींतून आनंद मिळवितात.<br>• विविध हालचालींतून आत्मविश्वासाने, देहबोलीद्वारे भाव-भावना व्यक्त करतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभवकथन** | • विविध प्रकारे (लहान मोठ्या स्वरांत) छोट्या छोट्या वाक्यांचे उच्चारण.<br>• मी, माझ्या कुटुंबातील, परिसरातील छोटे प्रसंग | पाठ्यपुस्तकातील वाचिक अभिनयास उपयुक्त वाक्ये, संवाद, छोटे प्रसंग, घटना. | • आवाजातील चढउतार जाणून घेतात.<br>• वाक्यातील आशयानुसार उच्चार करतात.<br>• निरीक्षण व अनुकरण करतात.<br>• आवाजातून, संवादातून भावभावना व्यक्त करतात.<br>• कुटुंब, परिसरातील व्यक्तींची माहिती सांगतात.<br>• कुटुंब, परिसरातील लहान-लहान प्रसंगांचे निरीक्षण करून वर्णन करतात. • आत्मविश्वासाने अनुभवकथन करतात. |
| | **सादरीकरण/ एकात्मिक सादरीकरण** | • प्राणी, पक्षी यांच्या कथांचे एकात्मिक सादरीकरण (चित्र-शिल्प, संगीत, नाट्य या कलांचे एकत्रित सादरीकरण) | पाठ्यपुस्तक, लहान गोष्टींची पुस्तके | • प्राणी, पक्षी यांच्या हालचालींचे निरीक्षण करतात.<br>• प्राणी, पक्षी यांच्या हालचाली देहबोलींतून व्यक्त करतात.<br>• छोट्या-छोट्या कथांचा आशय जाणून घेतात.<br>• आशयानुसार आत्मविश्वासाने कथांचे सादरीकरण करतात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • पडदा, रंगमंच, प्रेक्षागृह | वर्ग, विद्यार्थी, वर्गातील उपलब्ध साहित्य | • वर्गातील विद्यार्थी, शरीराकृतींच्या सहाय्याने, पडदा, रंगमंच, या भागांची रचना करतात व माहिती जाणून घेतात.<br>• उपलब्ध वर्गसाहित्याचा योग्य वापर करून प्रेक्षागृहाची रचना करतात. |
| | **नेपथ्य** | • झाड, घर, विहीर इ. परिसरातील घटकांची विद्यार्थ्यांकडून कृती. | वर्ग, विद्यार्थी, वर्गातील उपलब्ध साहित्य | • परिसरातील विविध घटकांचे निरीक्षण करतात.<br>• सहकार्यातून घटकांची निर्मिती करतात.<br>• नवनिर्मितीचा आनंद घेतात. • कल्पकतेने दृश्य साकारतात.<br>• संघभावना जोपासतात. |

## विषय : कलाशिक्षण

## इयत्तानिहाय विशिष्ट उद्‌दिष्टे

### इयत्ता ३ री ते ५ वी

### कलागट - चित्र-शिल्प

१) मनातील अव्यक्त कल्पना, भाव-भावना साकार करण्याची संधी देणे.

२) निसर्गातील निरनिराळे रंग, आकार यांचे निरीक्षण करता येणे व त्यांतील फरक ओळखता येण्याची क्षमता निर्माण करणे.

३) निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती यांचा विकास करण्यास मदत करणे.

४) विद्यार्थ्यांना कलानिर्मितीसाठी स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

५) विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला संधी देणे.

६) ‘स्व’-निर्मित कलाकृतीचा आनंद घेण्याची वृत्ती विकसित करणे.

७) कलाविष्कारासाठी विविध माध्यमे, अनुषंगिक कलासाधने आणि उपलब्ध साहित्य हाताळण्यास प्रवृत्त करणे.

८) कलेच्या माध्यमाद्‌वारे राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी संधी देणे.

***

### विषय : कला शिक्षण

## इयत्तानिहाय विशिष्ट उद्‌दिष्टे

### कलागट - संगीत (गायन, वादन, नृत्य)

### इयत्ता ३ री ते ५ वी

१) स्वतंत्र सादरीकरणाची क्षमता वाढीस लावणे.

२) नृत्याच्या माध्यमातून सहसंवेदना जाणणे.

३) देश व लोकसंस्कृतीबद्‌दलची प्रेमभावना वाढविणे.

४) स्वर, राग व ताल या मूळ संकल्पनांची ओळख करून देणे.

५) स्थानिक कलांचा परिचय करून देणे.

६) भाषिक सौंदर्याचा आस्वाद आणि आनंद घेणे.

७) आधुनिक दृक्-श्राव्य माध्यमांच्या उपयोगाने कलात्मक दृष्टीकोन प्रगल्भ करणे.

८) स्वर-ताल रचनानिर्मितीचा आनंद घेणे.

***

## विषय : कला शिक्षण

# इयत्तानिहाय विशिष्ट उद्दिष्टे

## कलागट - नाट्य

### इयत्ता ३ री ते ५ वी

१) आंगिक अभिनयातून नाट्यविषयाची आवड निर्माण करणे.

२) भावनांचे प्रकटीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

३) निरीक्षण, अनुकरण, कल्पकता यांना संधी उपलब्ध करून देणे.

४) नेपथ्यामध्ये साहित्याऐवजी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना कल्पक सहभागासाठी प्रवृत्त करणे.

५) चित्र-शिल्प, गायन-वादन, नृत्य यांचा नाट्यामध्ये एकात्म पद्धतीने आविष्कार करण्याची संधी देणे.

६) मुक्त आविष्कारातून स्वनिर्मितीचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

७) गुणग्राहकता व दाद देण्याची मनोवृत्ती तयार करणे.

८) स्वतंत्रपणे विचार करून आविष्काराची संधी उपलब्ध करून देणे.

९) दिलेल्या विषयावर नाट्य सादर करण्यासाठी प्रवृत्त करणे.

१०) रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य इत्यादी पूरक अंगांचा परिचय करून देणे.

***

# पाठ्यक्रम

## विषय – कलाशिक्षण

कलागट : चित्र–शिल्प

इयत्ता ३ री

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| चित्र | रेखांकन | ❖ **रेषा**<br>जाड रेषा, बारीक रेषा<br>❖ **आकार**<br>गोल आकार,<br>त्रिकोणी आकार,<br>चौकोनी आकार<br>• वरील आकारांवर आधारित पाने, फळे, वस्तूंचे आकार | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • जाड, बारीक रेषांच्या रेखाटनाचा सराव करतात.<br>• कोणत्याही यांत्रिक साधनांशिवाय रेषांचे रेखाटन करतात.<br>• गोल, त्रिकोणी, चौकोनी आकारांवर आधारित पाने, फळे, वस्तू यांचे आकार रेखाटण्याचा सराव करतात.<br>• रेखाटनासाठी विविध माध्यमांचा अनुभव घेतात.<br>• रेषा व आकारांतील फरक जाणून घेतात.<br>• भौमितिक व नैसर्गिक आकारांचा संबंध जोडतात. |
| | स्मरणचित्र | • मी/माझा/माझी/माझे घर, शाळा, वर्ग, कुटुंब<br>• परिचित सोप्या वस्तू<br>• छोट्या प्रसंगांचे रेखाटन | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • परिसरातील विविध प्रसंग, घटना, दृश्ये यांचे निरीक्षण करतात.<br>• दिलेल्या घटकांची स्वतंत्र/एकत्रित मुक्तपणे रेखाटने करतात.<br>• छोट्या–छोट्या प्रसंगाचे चित्रण करतात.<br>• मनातील भाव चित्रात व्यक्त करतात. |
| | कल्पनाचित्र | • काल्पनिक कथा, गोष्टीतील प्रसंग, परीकथा, पाठ्यपुस्तकातील कथा/कविता. | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, कथा–कवितांची पुस्तके, गोष्टींची पुस्तके, परिसरा–तील उपलब्ध अन्य साहित्य. | • पाठ्यपुस्तकातील व इतर काल्पनिक कथा, गोष्टी, कविता जाणून घेतात.<br>• परीकथेवर आधारित कल्पक चित्रे रेखाटतात.<br>• स्वत:च्या कल्पना प्रभावीपणे मांडतात.<br>• रेखाटनात रंगांचा कल्पकतेने वापर करतात.<br>• चित्रातील रेखाटन व रंगकामातील नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• रेखाटलेल्या चित्राबद्दल स्वत:चे विचार व्यक्त करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **नक्षीकाम (सजावट)** | • रेषा, नैसर्गिक–भौमितिक व मुक्त आकारांचा नक्षीकामाकरिता वापर.<br>• आवडीचे रंगसाहित्य व मुद्रा/कोलाज यांसारख्या तंत्राचा सजावटीसाठी स्वतंत्र किंवा एकत्रितपणे उपयोग. | पाटी–पेन्सिल, रंगीत खडू, कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, गेरू, कोळसा, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, शाई, रंग, सोनेरी–रुपेरी कागद, डिंक, विविध रंगीत कागद, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य तसेच भेंडी, कांदा, बटाटा व ठसे घेता येतील असे अन्य साहित्य. | • ठिपके, रेषा आणि गोल/त्रिकोण/चौकोन यांसारख्या आकारांची आवडीप्रमाणे मांडणी करतात.<br>• आवडीच्या बाह्य आकारात सजावट करतात.<br>• सजावटीसाठी आवडीच्या रंग माध्यमाचा वापर करतात.<br>• ठसेकामासाठी परिसरातील वस्तूंचा संग्रह करतात.<br>• सौंदर्यनिर्मितीसाठी मुद्रा/कोलाज तंत्राचा वापर करतात.<br>• नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात. |
| | **सुलेखन** | • अक्षरांचे अवयव उभ्या/आडव्या/तिरप्या/समांतर रेषा/अर्धवर्तुळ/वर्तुळ.<br>• अक्षर मुळाकार रचना<br>• साधन–साहित्य व तंत्राचा वापर. | पेन्सिल, मॅजिक स्लेट, साधी पाटी व लेखणी, रंगीत खडू, कागद, पेन, जेलपेन, स्केचपेन, दुरेघी वही. | • अक्षर अवयवांची ओळख करून घेतात.<br>• अक्षर व अंकांची मुळाकार रचना समजून घेतात.<br>• लेखनासाठी आवश्यक साधन–साहित्याचा परिचय करून घेतात.<br>• लेखनाचे तंत्र जाणून घेतात व लेखनाचा सराव करतात.<br>• सुंदर अक्षराचे महत्त्व जाणतात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • गोल, दंडगोल इ. घनाकारावर आधारित फळे. | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले–क्ले), कुंभारी माती, शाडू माती. | • मातकामासाठी योग्य माती तयार करतात.<br>• माती हाताळण्याचे कौशल्य जाणून घेतात.<br>• सूचित आकारावर आधारित फळांचे घनाकार तयार करतात.<br>• गोल, दंडगोल/घनाकार तयार करतात व आकारांतील फरक अनुभवात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागद फाडणे/घड्या घालणे/चिकटवणे.<br>• कागद फाडून रचनाकृती निर्मिती<br>• कागदाच्या सोप्या वस्तू. | वृत्तपत्रे, मासिके, पतंगी कागद, घोटीव कागद, सोनेरी–रुपेरी कागद, पातळ कागद, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर यांसारखे अन्य जाड–पातळ कागद, डिंक, खळ इ. सहज उपलब्ध होतील असे इतर साहित्य. | • विविध प्रकारच्या कागदांची ओळख सांगतात.<br>• विविध आकारात कागद हाताने फाडतात, कागदाला घड्या घालतात, कागद चिकटवितात.<br>• कागद फाडणे, घडी घालणे व चिकटविण्याचा अनुभव घेतात.<br>• कागदाच्या सोप्या वस्तू तयार करतात.<br>• वस्तूंवर कागदांची सजावट करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • त्रिमित वस्तूंची सजावट | निरुपयोगी वस्तू, रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे बोळके, बिया, धान्य, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • परिसरातील निरुपयोगी/निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• सजावटीसाठी योग्य वस्तूंची निवड करतात.<br>• त्रिमित वस्तूच्या पृष्ठभागावर अन्य निरुपयोगी वस्तू चिकटवून सजावट करतात.<br>• नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• वस्तू सजावटीमधून नवनिर्मितीचा आनंद घेतात. |

# पाठ्यक्रम

**कलागट : संगीत (गायन–वादन)** **विषय – कलाशिक्षण** **इयत्ता ३ री**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **गायन** | **बडबड गीते** | निसर्गनिर्मित गोष्टींशी संबंधित कथा सांगणारी गीते (उदा. झाड, प्राणी, पक्षी , ससा–कासव शर्यत,मुंगी– कबूतर). विद्यार्थ्यांना येणारी इतर गीते. | सी.डी.प्लेअर, चित्रे, तालवाद्ये, तक्ते | • प्राणीपक्ष्यांच्या निरीक्षणातून त्यांच्या सवयी, हालचाली समजून घेतात. • कृतींसह अभिनयगीते सादर करतात.<br>• माहीत असणारी इतर गीतेही उत्स्फूर्तपणे आवडीने सादर करतात. • नीतिकथांतून बोध घेण्याचा प्रयत्न करतात.<br>• भूतदया वाढीस लागते. • पर्यावरणविषयक जाणीव निर्माण होते. |
| | **समूहगीत** | पाठ्यपुस्तकातील कविता / देशभक्तीपर गीत | सी.डी. हार्मोनियम, टेपरेकॉर्डर, तालवाद्ये, पाठ्यपुस्तके. | • एकसुरात सामूहिक सादरीकरण करतात.<br>• देशभक्तीची भावना जागृत होते.<br>• पाठ्यपुस्तकातील कविता सामूहिकपणे म्हणण्याचा प्रयत्न करतात.<br>• काव्याचा आनंद घेतात. |
| | **लोकगीत** | स्थानिक भाषेतील लोकगीत | हार्मोनियम, उपलब्ध तालवाद्ये, टेपरेकॉर्डर, ध्वनिचित्रफीत | • स्थानिक लोककलेचा परिचय करून घेतात.<br>• पारंपरिक संस्कृतीचा परिचय व ओळख करून घेतात.<br>• वैयक्तिक सादरीकरण करू लागतात. |
| | **स्वरालंकार** | स्वरांचा परिचय<br>स्वरांची मूळ नावे<br>आरोह– अवरोह | हार्मोनियम, हस्तपुस्तिका | • गळ्याला सुराचे वळण लागते.<br>• स्वरांचे चढ–उतार समजू लागतात.<br>• संबंधित व्याख्या समजून घेतात. (स्वर, आरोह, अवरोह) |
| **वादन** | **वादन परिचय** | घनवाद्य परिचय (एकमेकांवर आघात झाल्याने तालनिर्मिती होणारी वाद्ये.) | खंजिरी, टाळ, चिपळ्या, चित्रे, प्रतिकृती, कृतिपुस्तिका | • आघातांतून ताल निर्मिती समजून घेतात.<br>• विविध घन वाद्यांचा परिचय करून घेतात.<br>• गीताबरोबर साथ करतात.<br>• साथ करण्याचा आनंद मिळवतात. |
| | **पार्श्वसंगीत** | उपलब्ध वाद्यांतून तालरचना. (१ ते ४ आकड्यांच्या आधाराने) | उपलब्ध वाद्य, आवाज निर्माण करणाऱ्या वस्तू. कृतिपुस्तिका | • तालाचा रचनात्मक आविष्कार करतात.<br>• लय समजून वाजवतात.<br>• कृतीला पूरक पार्श्वसंगीत निर्माण करतात. |

# पाठ्यक्रम

कलागट : संगीत (नृत्य) — विषय – कलाशिक्षण — इयत्ता ३ री

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | **हालचाली** | • हाताच्या बोटांचा परिचय. असंयुक्त हस्तमुद्रा, संयुक्त हस्तमुद्रा. | हाताची बोटे, कृती, चित्र | • हाताच्या बोटांची नावे जाणून घेऊन परिचय करून घेतात.<br>• क्रमानुसार बोटांची नावे सांगतात.<br>• हस्तमुद्रा म्हणजे काय हे समजून घेतात.<br>• एका हाताने व दोन हातांनी दाखविल्या जाणाऱ्या हस्तमुद्रांचा परिचय करून घेतात.<br>• वेगवेगळ्या संवादातून हस्तमुद्रांचे महत्त्व जाणून घेतात. |
| | **अभिनय गीत** | **साभिनय गीत**<br>• निसर्ग | सी.डी., कॅसेट, हार्मोनियम, तालवाद्ये, मोबाईल, उपलब्ध माध्यमे | • निसर्गातील विविध घटकांचे निरीक्षण करतात.<br>• निसर्गातील घटकांचे सौंदर्य समजून घेतात.<br>• निसर्गाबद्दल प्रेम, आपुलकीची भावना जोपासतात.<br>• निसर्गातील घटकांच्या डौलदार, लयबद्ध हालचाली जाणून घेतात.<br>• आशयानुसार गीताचे अभिनयासह सादरीकरण करतात. |

# पाठ्यक्रम

कलागट : नाट्य | विषय – कलाशिक्षण | इयत्ता ३ री

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • दैनंदिन जीवनातील कृती (साधनांशिवाय) उदा. दात घासणे, अंघोळ करणे, प्रार्थना करणे इ. | शब्दसूचना | • दैनंदिन कृतीचे निरीक्षण, अवलोकन करतात.<br>• विविध प्रकारच्या कृती लक्षात घेतात.<br>• देहबोलीतून योग्य कृतिद्वारे भावभावना व्यक्त करतात.<br>• नाट्यात्मक हालचालींना दाद देतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभव कथन** | • छोट्या प्रसंगांचे वाचन. पाठ्यपुस्तकातील संवादाचे आशयानुरूप वाचन<br>• मी व माझे कुटुंब, परिसर, शाळा येथील लहान लहान प्रसंग. | पाठ्यपुस्तक, गोष्टींचे पुस्तक | • आवाजांतील चढउतार व फरक जाणतात.<br>• वाक्यातील आशयानुरूप उच्चारण करतात.<br>• निरीक्षण व अनुकरण करतात.<br>• आवाजातून, संवादातून भावभावना व्यक्त करतात.<br>• कुटुंब, शाळा, परिसर यांतील लहान लहान प्रसंगांचे निरीक्षण करतात, माहिती घेतात व वर्णन करतात. |
| | **सादरीकरण/ एकात्मिक सादरीकरण** | • एकात्मिक पद्धतीने विविध प्रसंग, गायन, वादन, नृत्य, चित्र–शिल्प यांचा योग्य वापर करून सादरीकरण. उदा. वाढदिवस, सणसमारंभ इ. | तालवाद्ये व इतर माध्यमे | • प्रसंगातील आशय समजून घेतात.<br>• प्रसंगानुरूप संवाद साधतात.<br>• योग्य साधनांचा वापर करतात.<br>• सादरीकरणातून संघभावना जोपासतात.<br>• सादरीकरणातून विविध प्रसंगांचा आनंद घेतात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • रंगमंच, प्रेक्षागृह | वर्ग, विद्यार्थी, वर्गातील उपलब्ध साहित्य | • रंगमंचावर सादरीकरणाचा अनुभव घेतात.<br>• प्रेक्षक म्हणून आनंद घेतात.<br>• वर्गाची, रंगमंच व प्रेक्षागृह (बैठकव्यवस्था) अशी रचना समजून घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **नेपथ्य व तांत्रिक अंगे** | • परिसरातील उपलब्ध वस्तू (उदा. वर्तमानपत्रे, माती, पुठ्ठे, काड्या, लाकडे इ.)<br>• वेशभूषा (पोशाखाचे वर्णन)<br>• निसर्गातील, विविध प्रहर (सकाळ, दुपार, संध्याकाळ) | परिसरातील उपलब्ध साहित्य, परिसरातील व्यक्ती. | • सादरीकरणास उपयुक्त साहित्याची यादी करून संकलन करतात.<br>• कल्पनाशक्तीचा वापर करून नवनिर्मिती करतात.<br>• तयार केलेल्या साहित्याचा योग्य वापर करतात.<br>• विविध प्रकारच्या व्यक्तींच्या पोशाखाचे निरीक्षण करतात व अनुकरण करतात.<br>• निसर्गातील, विविध प्रहरातील दृश्यांचे निरीक्षण करतात. |